# महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

अर्ज क्रमांक १०/२०१६

जा.क्र.जिउनि/साव./कलम१८/जबाबों/लायगांव/२११६/२०१६
औरंगाबाद दिनांक १८/०४/२०१६

**वाचा :-**

१. श्री. जगन्नाथ बाबुराव बोगाने, रा. लायगांव ता.जि.औरंगाबाद यांचा तक्रार अर्ज दिनांक.२८/०१/२०१४
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिउनि/सावकारी/तक्रार/४५४/२०१४ दिनांक ०६/०२/२०१४
३. तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचा अहवाल दिनांक १७/०४/२०१४
४. श्री. बी.एम.नवथर चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल दिनांक ०७/०७/२०१४ व २०/११/२०१४
५. श्री. बी.एम.नवथर चौकशी अधिकारी यांचा जमिन ताबा संबंधाने स्थळ पाहणी पंचनामा दिनांक २९.०६.२०१४
६. श्री. जगन्नाथ बाबुराव बोगाने रा. लायगांव यांचे रू. १०० च्या बॉन्ड वरील शपथपत्र व आर्ज दिनांक ०१/०२/२०१६
७. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये सुनावणी नोटीस जा.क्र. जिउनि/सावकारी/क १८/५४३/२०१६ दिनांक ०२/०२/२०१६

श्री जगन्नाथ पिता बाबुराव बोगाने
रा. लायगांव ता. जि. औरंगाबाद — अर्जदार

**विरूध्द**

१. श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे
रा. इंदिरानगर गारखेडा परीसर औरंगाबाद — गेरअर्जदार

२. श्रीमती सुमनबाई रामभाऊ बोगाने
रा. लायगांव ता.जि. औरंगाबाद.

ज्याअर्थी वाचा क्रमांक १ अन्वये अर्जदार तक्रारदार श्री. जगन्नाथ बाबुराव बोगाने, रा. लायगांव ता.जि. औरंगाबाद (या पुढे ज्यांचा उल्लेख अर्जदार असा केलेला आहे.) यांनी गैरअर्जदार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे रा. इंदिरानगर गारखेडा परीसर औरंगाबाद यांचे विरूध्द अवैध सावकारी संबंधाने दिनांक २८/०१/२०१४ रोजी मा. सहकार मंत्री यांना उद्देशुन तक्रार केल्याने सदर तक्रार विशेष कार्याधिकारी यांनी त्यांचे शेऱ्यासह या कार्यालयाकडे त्वरीत कार्यवाहीस्तव पाठविलेली आहे.सदर तक्रारीत अर्जदार यांनी असे नमुद केले आहे की,त्यांची लायगाव

शिवारात गट नं.२०९ मध्ये जमिन होती. त्यांनी सन २००० मध्ये त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी गैरअर्जदार यांच्याकडे सदर गट नं.मधील ८० आर शेतजमिन रु.६९०००/- मध्ये गहाण ठेवली होती. ते रु.६९००० - त्यांनी मेहनतीने वर्षाला ५० ते ६० हजार रुपये दिले. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार सावकार यांना रु.४ ते५ लाख रुपये दिलेले आहे. संपुर्ण पैसे व्याजासहीत परत केल्यावर सदरची शेत जमीन त्यांच्या नावावर परत करुन देणे आवश्यक होते.तथापि अर्जदार यांचे अडाणीपणाचा गैरफायदा घेवुन गैरअर्जदार यांनी ०२ एकर जमीनीपैकी ११ आर जमीन त्यांच्या नावावर करुन त्यांची फसवणुक केली आहे. ज्यावेळी सदर फसवणुक त्यांच्या लक्षात आली त्यावेळी त्यांनी मा.जिल्हाधिकारी,मा.तहसिलदार औरंगाबाद यांच्याकडे तक्रार केलेली आहे. या तक्रारीनंतर गैरअर्जदार व त्यांचे कुटुंबातील इतर सदस्य हे शिवीगाळ करुन त्यांना अपमानीत करीत आहे. मा.तहसिलदार यांनी या शेतजमीनीबाबत त्यांची वहिती लावलेली आहे. ही शेत जमीन त्यांची वडीलोपार्जित असुन आजस्थितीला सदरची जमीन त्यांचे ताब्यात आहे.वरील प्रमाणे माहिती तक्रार अर्जात नमुद करुन त्यांनी न्याय मिळवुन देणेबाबत सदरहु अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

त्यानुसार सदर तक्रारीची चौकशी करण्यासाठी वाचा क्र.०२ अन्वये या कार्यालयाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांना कळविलेले होते. त्यानुसार त्यानी उक्त तक्रारीची चौकशी त्यांचे कार्यालयातील श्री बी.एम.नवथर,सहकार अधिकारी श्रेणी १ यांचे मार्फत केलेली आहे.संदर्भ क्र.०३ नुसार त्यांनी या बाबतचा चौकशी अहवल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

ज्याअर्थी या तक्रारीची चौकशी श्री बी.एम.नवथर,सहकार अधिकारी श्रेणी १यांनी केलेली असुन वाचा क्र.४ नुसार त्यांनी त्याचा अहवाल सादर केलेला आहे. त्या चौकशी अहवालात श्री बी.एम.नवथर,सहकार अधिकारी श्रेणी १ यांनी असे नमुद केलेले आहे की, अर्जदार यांचे बेकायदेशीर सावकारी तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचे आदेश दिनांक १४.०३.२०१४ नुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ मधील कलम १६ अन्वये अवैध सावकारी संदर्भातील कागदपत्रे हस्तगत करण्यासाठी दिनांक ११.०४.२०१४ रोजी गैरअर्जदार यांचे घराची घरझडती घेणेबाबत कार्यवाही निश्चित करण्यात आली व त्यानुसार पोलिस संरक्षणासह तपासणी पथकासह दिनांक ११.०४.२०१४ रोजी गैरअर्जदार यांचे राहते घराची घरझडती चौकशी अधिकारी यांनी घेतलेली आहे.याबाबत त्यांनी पंचनामा केलेला असुन या पंचनाम्यात नमुद यादी नुसार त्यांनी गैरअर्जदार यांचे राहते घरातुन पुढील प्रमाणे कागदपत्रे हस्तगत केलेली आहे.त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. ऑफिस मुळ संचिका-१

२. वैद्यनाथ बॅंक पासबुक (रविंद्र हिरे अकाउंट.नं.१४४०)

३. देवगिरी बँक पासबुक (कमलबाई हिरे अकाउंट नं.०८०२/१०/०१/०१०/७८३)

४. फाईल क्र.०१ भाडेकरार नामा (रविंद्र हिरे व अनिल पावर (पान नं.१ ते ४)

५. फाईल क्र ०२ - डिड ऑफ कन्फरमेशन शॉप नं. ४ (शिवशंकर नागरी बँक- दिलीप शेळके (पानं.५ ते २२)

६. फाईल क्र.०३ - सातबारा गट नं.२०९/२००१-२००२

७. फाईल क्र.०४ - गावनमुना ७ (पान क्र.२४ ते २७)

८. फाईल क्र.०५ - जमिनीची भरणा पावती (पान क्र २८ ते ३३) (मधुकर गंगाधर टेहरे व कैलास नारायण टेहरे)

९. फाईल क्र.०६ - खरेदी खत (लक्ष्मन भिकजी पारधे व इतर व समशेखा बशिर खॉ)(पान क्र३४ ते ५२)

१०. फाईल क्र.०७ - पान ५३-१६६ शेती संबंधीत पावत्या (काही मुळ पावत्या व इतर छायांकित ) कार्यालय पत्र व्यवहार,तहसिल ऑफिसपत्र व्यवहार,सातबारे तसेच

१.खरेदी खत -रविंद्र मोतीराम हिरे ,गंगाधर नामदेव सुरडकर ( मु )

२.प्लॉट खरेदीखत -राजु धनाड व विजय दाने (मु)

३.जिरायत जमिनीचे खरेदी खत -जगन्नाथ बोंगाने ,कमलबाई रविंद्र हिरे ( मु )

४.प्लॉट खरेदी खत- विजय दानेकर व कार्तिकेयन ईलेमगोवन ( मु )

५.जिरायत शेत जमीनीचे खरेदीखत- कमलबाई हिरे व अंबादास यशवंत बोंगाने ( मु )

६.शेत जमिनीचे खरेदीखत -कमलाबाई व एकनाथ बाबुराव बोंगाने ( मु )

७.कोरडवाहु शेत जमिनीचे खरेदी खत -कमलाबाई हिरे व जगन्नाथ बाबुराव बोंगाने ( मु )

घरझडतीमध्ये जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रानुसारचा प्राथमिक अहवाल चौकशी अधिकारी यांनी दिनांक ११.०४.२०१४ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांना सादर केलेला आहे.

चौकशी अहवालात चौकशी अधिकारी यांनी असे नमुद केलेले आहे की,अर्जदार यांचे तक्रार अर्जानुसार त्यांनी सन २००० मध्ये मुलीच्या लग्नासाठी गैरअर्जदार सावकार श्री कमलबाई रविंद्र हिरे व इतर ०३ यांचे कडुन रु.५%शेकडयाप्रमाणे रु.६९,०००/- व्याजाने घेतले. सदरची रक्कम घेतल्यानंतर अर्जदार यांनी काही दिवसातच गैरअर्जदार यांना रु.१,८०,०००/- परत केले .अर्जदार यांना व्याजाची रक्कम देतांना गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचा भोळसर व अडाणीपणाचा फायदा घेवुन गॅरंटीपोटी पैशास धर म्हणुन शेतजमीनीचे खरेदीखत करुन दया असे सांगुन दुय्यम निबंधक,कार्यालयास घेवुन गेले व फक्त इसार पावती करतो असे सांगुन त्यांच्याकडुन कायम खरेदीखत करुन घेतले. ज्यावेळी खरेदीखत करुन दिलेले होते त्यावेळी सदरील जमीनीचा ताबा गैरअर्जदार यांना दिलेला नव्हता

तसेच आजतागायत तेच जमीन कसत असल्याबाबत या जमिनीवर महसुली दप्तरी ७ब लावण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जापासुन आजतागायत सदरील जमिनीवर त्यांचे महसुली दप्तरी ७ब असुन सदर जमीनीचे प्रत्येक वर्षी पंचनामे होवुन सर्व पंचनामे त्यांच्या हक्कात तहसिल कार्यालयाने घेतलेले आहे. या ७ब व पंचनाम्याच्या प्रती त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या आहेत. त्यामुळे कायमखरेदी खतानुसार गट नं.२०९ मधील ८० आर जमीन गैरअर्जदार यांची असली तरी शेत जमीनीचा प्रत्यक्ष ताबा ७ब नुसार अर्जदार यांचा असल्याचे गावपंचनामा व मा.तहसिलदार यांचा अहवाल दिनांक १०.०६.२०११ वरुन दिसुन येते. तसेच घरझडती पंचानामा कार्यवाही दरम्यान हस्तगत करण्यात आलेले कागदपत्राचे अवलोकन केले असता, सावकारी व्यवसाय करित असल्याबाबत नोंदी किंवा व्याज आकारणी देणे घेणे इत्यादी नमुद असल्याचे कागदपत्र दिसुन येत नाही .परंतु हस्तगत केलेल्या कागदपत्रामध्ये कायम खरेदी खतांच्या नकलांची संख्या (एकुण ०९) पहाता सदर प्रकरणी अवैध सावकारी झाल्याचे नाकारता येत नसल्याचे नमुद आहे.तसेच गैरअर्जदार यांचे राहते घराचे घर झडतीमध्ये हस्तगत केलेले खरेदी खत व इतर कागदपत्रे अर्जदार यांचा अर्ज व त्यासोबतचे कागदपत्रे त्यानुसार उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औ.बाद कार्यालयात निश्चित केलेली सुनावणी व सदर सुनावणीत उपनिबंधक,कार्यालयात सादर झालेले प्रतिज्ञापत्र पहाता गैरअर्जदार हे बेकायदेशिर सावकारी करित असल्याबाबत प्रथम दर्शनी दिसुन येते असे उपनिबंधक सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचे १४.०३.२०१४ चे पत्रात स्पष्टपणे नमुद आहे.

ज्याअर्थी वाचा क्र.०५ अन्वये चौकशी अधिकारी यांनी, ता.उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचे दिनांक ११.०६.२०१४ चे पत्रास अनुसरुन चौकशी अधिकारी यांनी अर्जदार यांचे अर्जातील मौजे लायगाव ता.औरंगाबाद येथील गट नं.२०९ मधील एकुण क्षेत्राबाबत व प्रत्यक्ष ताबा /वहिती याबावत भेट देवुन त्यांनी ताबा /वहिती पंचनामा करणेबाबत निश्चित केले त्यानुसार २९.०६.२०१४ रोजी मौजे लायगाव ता.औरंगाबाद येथे भेट देवुन प्रत्यक्ष पहाणी व पंचनामा केला त्यानुसार गट नं.२०९ मधील सदरील जमीन अर्जदार यांचे ताब्यात असल्याचे निदर्शनास आल्याबाबत पंचनामा नमुद आहे,या बाबतच्या पंचनाम्यावर आजुबाजुचे स्थानिक रहिवाशी ,शेजारी व तपासणी पथकातील सदस्यासह एकुण ०१ ते २६ व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या आहेत.त्या पंचनाम्यात असे नमुद आहे की, मौजे लायगाव ता.औरंगाबाद येथील गट नं २०९ मध्ये एकुण एकुण क्षेत्रापैकी तक्रार अर्जातील क्षेत्र ८० आर जमीन तसेच सदर गट नं.मधील एकुण क्षेत्र १ हेक्टर ४५ आर जमीन अर्जदार यांचे वडीलोपार्जित जमिन असुन सन १९९९ मध्ये अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना खरेदी खत करुन दिले परंतु सदरील जमीन अर्जदार यांचे ताब्यात वहितीस आहे.तसेच मशागतीचे कामे अर्जदार हेच करतात असे उपस्थित पंचांनी सांगितलेले आहे. तसेच या जमिनीबाबत तंटामुक्ती ,गावसमिती लायगाव यांनीही यापुर्वी अर्जदार यांची ही वडीलोपार्जित शेत जमिन तेच वहिती करित असल्याबाबत पंचनामा केलेला आहे. तो यापुर्वीच्या तक्रार अर्जाला जोडलेला आहे.त्याबाबत पंचनाम्याच्या वेळी उपस्थित शेतकरी यांच्याकडे चौकशी अधिकारी यांनी चौकशी केली असता ,सर्वांनी या शेतजमिनीवर अर्जदार यांचा

ताबा वहिती असल्याबाबत स्पष्टपणे सांगितले तसेच या बाबत दिनांक १०.०६.२०११ रोजी तत्कालीन नायब तहसिलदार यांचा अहवाल व पंचनामा दिनांक ०५.०५.२०११ दाखविला असता त्यानुसार या शेतजमिनीवर अर्जदार यांचा ताबा व वहिती आहे असे स्पष्ट सर्व उपस्थित पंचांनी सांगितलेले आहे,अशी वरीलप्रमाणे जमिनिच्या प्रत्यक्ष ताब्याबाबत माहिती पंचनाम्यात नमुद आहे.

ज्याअर्थी वाचा क्र.०६ नुसार अर्जदार यांनी त्यांच्या अर्ज व रु.१००/-च्या प्रतिज्ञापत्रावर शपथपत्र सादर केलेले असुन त्या शपथ पत्रामध्ये असे नमुद केले आहे की, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ व कलम १७ नुसार कार्यवाही करुन सावकाराने अवैध रित्या खरेदी केलेल्या जमिनीचे खरेदीखत अवैध घोषित करुन त्यांची शेत जमिन परत त्यांच्या नावावर मिळणेबाबत शपथपत्रात विषय नमुद करुन सदर शपथपत्रात त्यांनी तक्रार अर्जात नमुद केलेली माहिती लिहलेली आहे.तसेच शपथपत्रासोबतचा अर्जात त्यांनी असे नमुद केले आहे की, ते मौजे लायगाव ता.जि.औ.बाद येथील रहिवासी असुन व्यवसायाने शेती करतात गट नं.२०९ मध्ये त्यांची वडीलोपार्जित ८० आर जमिन आहे. त्यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी नोव्हेंबर २००० मध्ये गैरअर्जदार यांच्या कडुन रु.६९,०००/- व्याजाने घेतले होते.सदरच्या रक्कमेला एका वर्षाचे व्याज रु.३०,०००/- असे ठरविलेले होते.या रक्कमेला सुरक्षितता राहावी म्हणुन वरील नमुद ८० आर शेत जमिन गैरअर्जदार यांचे नावाने दिनांक ३०.११.२००० रोजी नोंदणीकृत दस्तऐवज नं.५५४५ /२००० व्दारे दुय्यम निबंधक,औरंगाबाद या कार्यालयात खरेदी खत करुन दिले होते. सदर दस्त ऐवजात जरी अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना ८० आर क्षेत्राचा ताबा दिला असे दर्शविले असलेतरी व्यवहार फक्त व्याजाचा असल्याने कर्जाउ घेतलेल्या रक्कमेच्या व्याजाबद्दल जमिनीचा प्रत्यक्ष ताबा गैरअर्जदार यांना दिलेला नव्हता.अर्थातच हा व्यवहार खरेदीचा नसल्याने प्रत्यक्ष ताबा देण्याचा प्रश्न उदभवत नाही.आज रोजी सुध्दा वादातील मिळकत अर्जदार यांच्या ताब्यात व कब्जात आहे. वहिती रकान्यामध्ये अर्जदार यांच्या नावाची महसुल अभिलेख्यामध्ये नोंद आहे. अर्जदार हे सदर मिळकतीचा महसुल भरीत आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन घेतलेल्या रु.६९,०००/- चे कर्जापोटी जवळपास ४ ते ५ लाख साक्षिदारसमक्ष दिलेले आहे. तरीपण गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्या हक्कात वरील मिळकतीचे खरेदी खत करुन दिलेले नाही,त्यामुळे अर्जदार यांनी दिनांक २८.०१.२०१४ रोजी मा. सहकार मंत्री यांच्याकडे तक्रार अर्ज देवुन गैरअर्जदार सावकार यांनी हडप केलेली जमिन परत करण्यासंबंधी अर्ज केलेला आहे.त्यानुसार सदरहु तक्रार अर्जाची चौकशी होवुन चौकशी अहवाल सादर झालेला आहे. त्याचौकशी अहवालमध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे की, गैरअर्जदार हे अवैधरित्या सावकारी करीत असल्याचे दिसुन येते ,गैरअर्जदार यांचे घरामधुन एकुण ०९ खरेदी खत हस्तगत केले व विवादीत जमिन अर्जदार यांचे ताब्यात असुन त्यांचे नावावर वादातील मिळकतीवर ७ ब भरलेले आहे.तसा पंचनामा महसुल अधिकारी यांनीही केलेला आहे. दिनांक १०.०६.२०११ रोजी नायब तहसिलदार महसुल १ व इतर महसुल

अधिकारी यांनी वादातील मिळकतीची स्थळ पहाणी व तसा पंचनामा दिनांक ०५.०५.२०११ रोजी केला व त्याबाबतचा अहवाल दिनांक १०.०६.२०११ रोजी सादर केलेला आहे.त्यात असे स्पष्ट म्हटले आहे की, अर्जदार हे जमिनीबाबत प्रत्यक्ष ताब्यात व कब्जामध्ये आहेत. तसेच तलाठी सजा पांढरी(पी)ता.जि.औ.बाद यांनी दिनांक १८.०६.२०१० रोजी मा.तहसिलदार यांना चौकशी अहवाल व वादातील जमिन गट नं.२०९ मध्ये अर्जदार यांचे ०१ हेक्टर ४५ आर क्षेत्रावर ७ब लावण्यासाठी प्रस्ताव सादर केला.अर्जदार व गैरअर्जदार मध्ये मा.जिल्हा न्यायालय औरंगाबाद येथे वादातील मिळकतीसंदर्भात अपिल प्रलंबित आहे. त्यामध्ये अर्जदार यांचे बाजुने स्थगिती आदेश दिलेले आहे.

श्री उत्तमराव अश्रुबा बोंगाने ,श्री निजाम अब्बास पठाण ,श्री हसन उस्मान पठाण व श्री हरिभाउ सुर्यभान नागरे यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचेकडे प्रत्यक्ष जवाब नोंदवुन शपथपत्र दाखल केलेले आहे.त्यांचे समक्ष अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना व्याजापोटी रु.१,८०,०००/- दिलेले आहे,असे शपथपत्र सादर केलेले आहे. अर्जदार यांच्या तक्रारीनुसार व चौकशी अहवालानुसार कार्यवाही न झाल्याने अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे फौजदारी याचीका क्रमांक २२२/२०१५ दाखल केली होती. सदरील याचीकेची सुनावाणी दिनांक १५/०१/२०१६ रोजी झाली सुनावणी अंती मा. उच्च न्यायालयाने याचीकेतील प्रतिवादी यांना महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार कार्यवाही करण्यात यावी व अवैध सावकारा विरूध्द फौजदारी स्वरूपाची कार्यवाही सुध्दा करू शकतात. असे आदेश पारीत केलेले आहे. अर्जासोबत अर्जदार यांनी दिनांक ३०/११/२००० रोजी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत दिनांक २३/०५/२००१ रोजी प्रतिवादीच्या हक्कात श्री. एकनाथ बाबुराव बोगाने यांनी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत जोडलेली आहे. तसेच दिनांक २६/०३/२००२ रोजी गैरअर्जदार यांच्या हक्कात श्री. आंबादास यशवंता बोगाने यांनी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत जोडली आहे दिनांक १६/०२/२००१ रोजी गैरअर्जदार यांच्या हक्कात श्री. शिवाजी यशवंता बोगाने यांनी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत जोडली आहे. तसेच चौकशी अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत महसुल अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रती सोबत जोडल्या आहे.

या बाबीचा विचार करता गैरअर्जदार यांनी अवैधरीत्या सावकारी करून अर्जदार व इतर लोकांच्या शेतजमिनी हडप केल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अर्जदार यांचे करून घेतलेले खरेदीखत क्रमांक ४५५५/२००० दिनांक ३०/११/२००० रद्द करून अवैध असल्याचे घोषीत करण्यास विनंती केली आहे. या अर्जावर साक्षीदार म्हणुन श्री. हसन उस्मान पठाण व श्री. हरीभाऊ सुर्यभान नागरे यांच्या सहया आहेत.

अर्जदार यांनी त्यांचे शपथ पत्र व अर्जासोबत त्यांनी दिनांक २८.०१.२०१४ रोजी मा.मंत्री यांना केलेल्या तक्रारीची प्रत सोबत जोडलेली आहे.त्यातील मजकुर सुरवातीस नमुद करण्यात आलेला आहे. तसेच या कार्यालयाने उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांना दिनांक ०६.०२.२०१४ रोजी अर्जदार यांचे तक्रारीवर चौकशी कामी दिलेल्या पत्राची प्रत अर्जासोबत जोडलेली आहे. तसेच तालुका उपनिबधक, सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांनी गैरअर्जदार याचे राहते घराची घरझडती बाबत दिनांक १४.०३.२०१४ चे आदेशानुसार नियुक्त केलेल्या तपासणी पथकाच्या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. तसेच चौकशी अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेल्या चौकशी अहवालची प्रत जोडलेली आहे.ज्यामधील नमुद बाबीचा समावेश वाचा क्र. ०४ मध्ये नमुद केलेला आहे.

अर्जदार यांनी त्यांचे अर्जासोबत श्री डी.एन.भारस्कर नायब तहसिलदार महसुल १ यांनी दिनांक १०.०६.२०११ रोजी मा.तहसिलदार औरंगाबाद यांना लिहलेल्या अहवालाची प्रत सादर केलेली असुन त्यामध्ये नायब तहसिलदार यांनी असे नमुद केले आहे की, मौजे लायगाव ता.जि.औ.बाद येथील गट नं.२०९ मधील जमीनीच्या स्थळ पाहणीबाबत माहिती नमुद असुन त्यांनी दिनांक ०५.०५.२०११ रोजी समक्ष जाय मोक्यावर जावुन स्थळ पाहणी करुन त्याबाबत पंचनामा केलेला आहे. त्या पंचनाम्यानुसार त्यांनी अहवालात असे नमुद केले आहे की, मौजे लायगाव ता.जि.औरंगाबाद येथील गट नं.२०९ मध्ये अर्जदार यांची वडीलोपार्जित जमिन असुन यापैकी ०१ हेक्टर ४५ आर जमिन गैरअर्जदार यांचे मालकीची कागदोपत्री आहे. सदरील जमिनीवर अर्जदाराचा प्रत्यक्ष कब्जा असल्याने अर्जदाराचे नाव वहितीस लावणेबाबत अर्जदाराने दिनांक ०१.०७.२०१० रोजी अर्ज सादर केलेला आहे. गैरअर्जदार यांनी दिनांक २१.०१.२०११ रोजी अर्ज देवुन कळविले आहे की, त्यांची लायगाव येथे गट नं.२०९ मध्ये ४ एकर जमिन सन २००० मध्ये घेतलेली असुन पीक पेरे व इतर महसुली दस्तऐवजावर त्यांचे नाव लागलेले आहे. अर्जदार हे त्यांच्या कडे सालगडी म्हणुन पाहत आहे. ते जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांनी अर्जदार यांचे विरुध्द मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे.

नायब तहसिलदार यांनी प्रत्यक्ष जाय मोक्यावर जावुन स्थळ पाहणी केली असता मौजे लायगाव येथील गट नं.२०९ मधील जमिनीचे क्षेत्र ०१ हेक्टर ४५ आर ज्यांच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे आहेत.

पुर्वेला - सुमनबाई रामभाउ

पश्चिमेला - रावसाहेब पाटील तोताराम पाटील

दक्षिणेला - दत्तु धर्माजी खुरमुटे,शिवाजी धर्माजी खुरमुटे

उत्तरेला - रावसाहेब व संजु काळु बोंगाणे

सदरील गट नु.२०९ मधील १ हेक्टर २५ आर जमिन अर्जदार यांची वडीलापार्जित जमिन असुन सन १९९९ मध्ये अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना खरेदीखत करुन दिल्याचे पंचासमक्ष उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले तथापि

सदरील १ हेक्टर ४५ आर जमिन अर्जदार यांच्या ताब्यात असुन सदर जमिनीचे वहितीचे व मशागतीचे काम अर्जदार हेच करित असल्याबाबत उपस्थित शेतकरी यांनी पंचासमक्ष सांगितले . त्यानुसार लायगाव येथील गट नं.२०९ मधील १ हेक्टर ४५ आर जमिनीची प्रत्यक्ष वहिती अर्जदार हे करीत असल्याचे व त्यावर अर्जदार यांचाच ताबा असल्याचे त्यांनी त्यांचे अहवालात नमुद केलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांचे अर्जासोबत १. श्री उत्तमराव अश्रुबा बोंगाणे रा.लायगाव ता.जि. औ.बाद

२. श्री निजाम अब्बास पठाण रा.लायगाव ता.जि.औरंगाबाद

३. श्री हसन उस्मान पठाण रा.लायगाव ता.जि.औ.बाद

४. श्री हरिभाउ सुर्यभान नागरे रा.लायगाव ता.जि. औ.बाद

यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औ.बाद यांचे समोर दिनांक ३१.१२.२०१४ रोजी दिलेल्या शपथपत्राची प्रत जोडलेली आहे. त्या शपथपत्रामध्ये सदरहु शपथपत्र करून देणारे साक्षिदार यांनी असे नमुद आहे की, गैरअर्जदार सावकार यांच्या बेकायदेशीर सावकारी बदल्यात अंर्जदार यांनी गट नं.२०९ मधील ०२ एकर जमिन सन २००० मध्ये सावकारास रक्कम रु. मुद्दल ६९०००/- ५% शेकडयाच्या व्याजाबदल्यात खरेदी खताव्दारे सदर कर्जास गहाण करुन दिल्याचे आणि ही जमिन आजही अर्जदार यांचे ताब्यात असल्याबाबतचे शपथेवर नमुद केलेले आहे.तसेच त्याबाबतचे त्याच्या नावाने महसुली रेकॉर्ड ७ब ची नोंद आहे. आजही अर्जदार यांनी या जमिनीमध्ये ०१ एकर कापुस व ०१ एकर हरभरा पेरलेला आहे. सदर जमिन सावकारी कर्जाच्या बदल्यात खरेदी खताव्दारे रजिस्ट्री करून दिलेली असुन गैरअर्जदार यांचे सर्व पैसे ५% व्याजाने आतापर्यंत रु.१,८०,०००/- परत केले .सदर गहाण जमिन परत करण्याविषयी व त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी यासाठी सदरचा जवाब दिनांक ३१.१२.२०१४ रोजी लिहुन दिलेला आहे.

ज्या अर्थी अर्जदार यांचा अर्ज व शपथपत्र प्राप्त झाल्याने या कार्यालयाने वाचा क्रमांक ७ नुसार सुनावणी नोटीस निर्गमित करून या प्रकरणी प्रथम सुनावणी दिनांक ०९/०२/२०१६ रोजी ठेवण्यात आलेली होती. या सुनावणीस अर्जदार यांचे सह त्यांचे वतीने ॲड पि.आर.सोळंके हजर तसेच गैरअर्जदार यांचे वतीने ॲड प्रमोद कुळकर्णी हजर झाले. गैरअर्जदार यांचे वकील प्रमोद कुळकर्णी यांनी लेखी अर्ज देऊन सांगितले की, या संबंधाने दाव्याची नोटीस मिळालेली आहे. तथापी दाव्याची प्रत मिळालेली नाही. ती मिळण्यास विनंती केली आणि लेखी म्हणने सादर करण्यास वेळ देण्यास विनंती केली. त्यानुसार गैरअर्जदार यांचे वकील यांना दाव्याची प्रत देण्यात आली. पुढील सुनावणी दिनांक १७/०२/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०२/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार हजर गैरअर्जदार यांचे वतीने ॲड प्रमोद कुळकर्णी यांनी लेखी म्हणणे दाखल केलेला आहे .त्याची प्रत अर्जदार यांना देण्यात आली व पुढील सुनावणी दिनांक २६/०२/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

गैरअर्जदार यांनी दिनांक १७.०२.२०१६रोजी दाखल केलेल्या म्हणण्यात पुढील बाबी नमुद केलेल्या आहे.त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी अर्जदाराकडुन ०१ एकर शेत जमीन खरेदी खताव्दारे दिनांक ३०.११.२००० रोजी खरेदी केलेली असुन या जमीनीचा गट नं.२०९ असुन ती शेतजमीन लायगाव शिवारात आहे व दुसरी ०१ एकर शेत जमीन श्रीमती सुमनबाई रामभाउ बोंगाणे यांच्याकडुन खरेदी केलेली असुन त्यानुसार सदर शेत जमीनचा फेरफार झालेला आहे.व खरेदीखता नुसार अर्जदार यांनी लायगाव शिवारातील गट नं.२०९ मधील शेत जमीनीचा ताबा दिलेला आहे. तलाठी यांनी या ०१ एकर शेत जमीनीची ७/१२ उता-यावर त्यांच्या नावाची नोंद घेतलेली आहे. गैरअर्जदार यांचे नाव ७ /१२ उता-यावर आहे.तलाठी यांनी शेत जमीन प्रत्यक्ष कोण कसत आहे? याबाबत भेट दिलेली असुन त्यानुसार त्यांनी सन २००० - २००१ मध्ये गैरअर्जदार यांचे नाव ७/१२ उता-यावर वहितीमध्ये घेतलेले आहे. अर्जदार यांनी सर्वप्रथम मुंबई सावकारी अधिनियम १९४६ नुसार गृहमंत्री मंत्री मा.आर.आर.पाटील यांच्याकडे दिनांक ११.०२.२०११ रोजी तक्रार देवुन त्या तक्रारीत असे नमुद केले होते की, श्री रविंद्र हिरे हे सावकारी करित असुन त्यांच्याकडुन त्यांनी रु.६९०००/-घेतलेलेआहे.या तक्रारीत त्यांनी असेही नमुद केले की, श्री रविंद्र हिरे यांनी त्यांची को-या बॉण्डवर सही घेतलेली आहे .अर्जदार यांनी ही २ एकर शेत जमीन परत मिळण्यास व गैरअर्जदार यांच्या विरुध्द कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. अर्जदार यांनी पुन्हा दिनांक ०४.०५.२०१२ रोजी याबाबत तक्रार दिली असुन त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, दिनांक ११.०२.२०११ चे अर्जानुसार त्यांच्याकडे श्री रविंद्र हिरे यांचे बाबत काही पुरावा नसल्याने त्यांनी गैरअर्जदार १ श्रीमती कमलबाई हिरे यांच्या विरुध्द कार्यवाहीची मागणी केलेली आहे. अर्जदार यांच्या दुस-या तक्रारीनुसार सहायक निबंधक,सहकारी संस्था यांनी सुनावणी नोटीस निर्गमित करुन सुनावणी अंती हा व्यवहार जमीन हस्तांतरण कायदा १८८२ नुसार असुन सदर तक्रार ही मुंबई सावकारी अधिनियम १९४६ अंतर्गत येत नसल्याबाबत दिनांक ०६.११.२०१२ रोजी सहाय्यक निबंधक,यांनी निर्णय दिलेला आहे. या आदेशाला अर्जदार यांनी आतापर्यंत आव्हान दिलेले नाही.त्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेले प्रकरण हे चालविणे योग्य नाही. तदनंतर मुंबई सावकारी अधिनियम १९४६ रद्द होवुन नव्याने महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ अस्तित्वात आला असल्याने अर्जदार यांनी पुन्हा याबाबत मा.सहकार मंत्री यांना दिनांक २८.०१.२०१४ रोजी तक्रार दिलेली आहे. त्यांत त्यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी विवादित ०२ एकर जमीन रु.६९०००/- मध्ये सावकारी व्यवसायात दिलेली असुन गैरअर्जदार यांना रक्कम परत करुनही त्यांनी शेत जमीन परत केलेली नसल्याने या प्रकरणी कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार या प्रकरणी

चौकशी बाबत आदेश झाले आहे. या तक्रारीनुसार गैरअर्जदार यांच्या घराची घरझडती दिनांक ११.०४.२०१४ रोजी करण्यात आली असुन या बाबतचा पंचनामा करण्यात आलेलाआहे.त्या पंचनाम्यात आक्षेपार्ह काहीही सापडले नसल्याबाबत नोंद आहे.अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचा चुकीचा अर्थ घेतलेला आहे. सहायक निबंधक यांनी य कार्यालयाकडे दिनांक ३१.०७.२०१४ रोजी दाखल केलेल्या अहवालात असे नमुद केलेले आहे की, घर झडतीच्या वेळी कोणतेही अवैध सावकारी बाबत आक्षेपार्ह बाबी सापडलेल्या नाही व याप्रकरणी यापुर्वी तक्रार निकाली काढलेली आहे.

मा.उच्च न्यायालयात यापुर्वी दाखल याचिकामध्ये मुंबई सावकारी अधिनियम १३ ब नुसार निर्णय झालेला आहे व जुने कलम १३ ब हे नविन कायदयानुसार कलम १८ झालेले असुन दोन्ही सारखे आहे ,असे नमुद केलेले आहे. याप्रकरणी निर्णय झालेला आहे,असे लेखी म्हणने सादर केलेले आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणण्यासोबत पुढील प्रमाणे कागदपत्रे सोबत जोडलेले आहे.त्यामध्ये सदरहु जमिनीचे खरेदीखत क्र.५५४५/२००० दिनांक ३०.११.२००० व शेत जमिनीचे ७/१२ तसेच अर्जदार यांनी दिनांक ११.०२.२०११ ,दिनांक ०४.०५.२०१२ रोजी केलेल्या तक्रारीची प्रत जोडलेली आहे. तसेच तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर दिनांक ०६.११.२०१२ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत जोडलेली असुन त्यानुसार अर्जदाराची शेत जमिनीची खरेदी विक्री ही मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ नुसार झालेली असुन अर्जदार यांनी गैरअर्जदार हे अवैध सावकारी करतात याबाबतचे सबळ पुरावे दाखल केलेले नाही.तसेच झालेल्या खरेदी खतामध्ये सावकारीच्या व्याजदाराचा कोणत्याही प्रकारचा उल्लेख नसल्यामुळे व गैरअर्जदार हे वारंवार जमिनीची खरेदी विक्री करतात याबाबतचे पुरावे दाखल केलेले नसल्याने मुंबई सावकारी अधिनियम १९४६ अंतर्गत हा व्यवहार येत नाही या बाबत अर्जदार योग्य त्या सक्षम न्यायालयात दाद मागु शकतात, असा निर्णय दिलेला आहे.

गैरअर्जदार यांनी अर्जासोबत अर्जदार यांच्या दिनांक २८.११.२०१४ च्या पत्राची प्रत चौकशी अधिकारी यांनी दिनांक ११.०४.२०१४ रोजी गैरअर्जदार यांचे घराचे घरझडतीबाबच्या पंचनाम्याची प्रत तालुका निबंधक,यांच्या दिनांक ३१.०७.२०१४ च्या अहवालाची प्रत व मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ बेंच नागपुर यांच्या याचिका क्र.५९९, २१५९, २३४५, २३९०, २४२९, २५५६, २५८०, २६८४, २८८२, २९६१, ३००४, ३०६२, ३०६३, ३०७९, ३११२, ३२१२, ३३८७, ३७९६, ४१६५, ४२८६ आणि ४२९९/२००६ यासर्व याचिका मध्ये दिनांक १३.१०.२००६ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे. तदनंतर सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २६/०२/२०१६ रोजी घेण्यात आली.

दिनांक २६/०२/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार हजर गैरअर्जदार यांचे वतीने ॲड प्रमोद कुळकर्णी यांनी हजर राहुण लेखी अर्ज देऊन विनंती केली की, सदरील प्रकरण मेंन्टेनेबल नाही. असा अर्ज देऊन प्रकरण निकाली काढण्यास विनंती केली याची प्रत अर्जदार यांना देऊन त्यावर म्हणने मांडण्यासाठी वेळ देण्यात येऊन पुढील सुनावणी दिनांक ०१/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार यांचे वकील उपस्थित तसेच अर्जदारांच्या वतीने अर्जदार यांनी स्वताःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले तसेच अर्जदाराच्या वतीने श्री. हरीभाऊ नागरे व हसन उस्मान पठाण यांचे पुराव्याचे शपथपत्र सादर केले त्याच्या प्रती गैरअर्जदार यांना देण्यात आल्या व उलट तपासणी साठी पुढील सुनावणी दिनांक ०५/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीत अर्जदार यांनी पुराव्याचे शपथपत्र सादर केलेले असून त्या शपथपत्रात त्यांनी तक्रार अर्जातील व शपथपत्रातील मजकुर नमुद केलेला आहे.

तसेच सदरहु सुनावणीच्या वेळी अर्जदार यांच्या वतीने श्री. हरीभाऊ सुर्यभान नागरे यांनी पुराव्याचे शपथपत्र सादर केले असून त्या शपथपत्रात श्री. हरीभाऊ सुर्यभान नागरे यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २ एकर शेतजमिन गैरअर्जदार यांना सावकारी पोटी पैशास धर म्हणुन दिलेली आहे. अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी सावकारी कर्जापोटी रू. ६९०००/- दिलेले होते. अर्जदार यांनी त्यांच्या समक्ष गैरअर्जदार यांना संपुर्ण व्याजासहीत रक्कम डिसेंबर २०१० मध्ये परत केलेली आहे. परंतु गैरअर्जदार सावकार यांनी संपुर्ण व्याजासहीत पैसे परत केलेले असतांना सुध्दा अर्जदार यांच्या हक्कात जमिनीचे खरेदीखत करून दिलेले नाही. तसेच विवादीत जमिनीवर अर्जदार यांचा ताबा आहे. असे शपथपत्र नोटरी समक्ष लिहुन देऊन सुनावणीच्या वेळी सादर केलेले आहे.

तसेच सदरहु सुनावणीच्या वेळी अर्जदार यांच्या वतीने श्री. हसन उस्मान पठाण यांनी पुराव्याचे शपथपत्र सादर केले असून त्या शपथपत्रात श्री. हसन उस्मान पठाण यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २ एकर शेतजमिन गैरअर्जदार यांना सावकारी पोटी पैशास धर म्हणुन दिलेली आहे. अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी सावकारी कर्जापोटी रू. ६९०००/- दिलेले होते. अर्जदार यांनी त्यांच्या समक्ष गैरअर्जदार यांना संपुर्ण व्याजासहीत रक्कम डिसेंबर २०१० मध्ये परत केलेली आहे. परंतु गैरअर्जदार सावकार यांनी संपुर्ण व्याजासहीत पैसे परत केलेले असतांना सुध्दा अर्जदार यांच्या हक्कात जमिनीचे खरेदीखत करून दिलेले नाही. तसेच विवादीत जमिनीवर अर्जदार यांचा ताबा आहे. असे शपथपत्र नोटरी समक्ष लिहुन देऊन सुनावणीच्या वेळी सादर केलेले आहे. तदनंतर पुढील सुनावणी दिनांक ०५/०३/२०१६ रोजी घेण्यात आली.

दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व त्यांच्या वतीने अ‍ॅड एम.एस.कराड हजर तसेच गैरअर्जदार यांच्या वतीने अ‍ॅड प्रमोद कुळकर्णी हजर गैरअर्जदार यांच्या वकीलांनी अर्जदारांनी साक्षीदाराचे सादर केलेल्या शपथपत्रावर नमुद विषयाचे मुद्दे निश्चित करणे साठी अर्ज दिला. त्यानुसार पुढील मुद्दे निश्चित करण्यात आले.

मुद्दा क्र. १. सदर व्यवहार सावकारी पोटी जमिन खरेदीखत गहाण म्हणुन आहे काय?

२. प्रस्तुत प्रकरण या कार्यालयाच्या कार्यक्षेतील आहे काय?

३. प्रस्तुत व्यवहारात किती एकर चे खरेदीखत हे गहाण खत आहे ?

उपरोक्त तिन मुद्याच्या संदर्भाने अर्जदाराचे वकील यांनी सांगितले की, एक एकर जमिन अर्जदाराने स्वता: खरेदीखता द्वारे गहाण खत म्हणुन दिलेली आहे व अर्जदाराच्या हिश्याची विभक्ती करणामध्ये श्रीमती सुमनबाई रामभाऊ बोगाने यांच्या नावावर गेलेली एक एकर शेतजमिन खरेदीखता खताद्वारे गहाण म्हणुन गैरअर्जदार यांच्या नावावर अर्जदाराने करून दिलेली आहे. त्यामुळे श्रीमती सुमनबाई रामभाऊ बोगाने यांना गैरअर्जदार २ करणे बाबत निर्णय घेण्यात आला व त्यांना नोटीस देऊन पुढील सुनावणी दिनांक १०/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व त्यांचे वकील उपस्थित तसेच गैरअर्जदार यांचे वकील गैरहजर तसेच गैरअर्जदाराच्या वतीने त्यांचा मुलगा विकास हिरे हजर होऊन त्यांनी पुढील तारीख देणे बाबत विनंती केली. तसेच गैरअर्जदार क्र.२ सुमनबाई बोगाने यांच्या वतीने अ‍ॅड एस.बी.सोळंके हजर होऊन वकील पत्र व लेखी जवाब सादर केला त्याची अर्जदार व गैरअर्जदार यांना देण्यात आली पुढील तारीख दिनांक १७/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.गैरअर्जदार क्र .०२ यांच्या वतीने अ‍ॅड एस.बी.सोळंके यांनी लेखी म्हणणे सादर केले असुन त्यांत असे नमुद आहे की, सदयस्थित या कार्यालयात चालु असलेल्या प्रकरणाबाबत त्यांना पुर्ण माहिती असुन अर्जदार यांनी त्यांची मौजे लायगाव शिवारातील गट नं.२०९ मधील जमिनीबाबत गैरअर्जदार यांच्या विरुध्द सावकारी बाबत तक्रार दाखल केलेली असुन यातक्रारीत अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचे नावाने त्यांचे ताब्यातील ०२ एकर क्षेत्र लिहुन दिलेले आहे.त्या ०२ एकर क्षेत्रापैकी तुकडेबंदी मध्ये ०१ एकर क्षेत्र त्यांच्या नावाने असुन अर्जदार हे त्यांचे दिर आहे. सदरील क्षेत्र अर्जदार यांच्याच मालकीचे असुन ते चुकुन त्यांचे नावे असल्याने खरेदीखत करते वेळेस अर्जदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी दुय्यम निबंधक, कार्यालयात जावुन गैरअर्जदार सावकार यांच्या नावाने खरेदी खताव्दारे लिहुन दिलेले आहे. गैरअर्जदार सावकार यांनी अर्जदार यांना सदर जमिन गहाण खत करुन घेतांना रक्कम रु.६९०००/- दिली होती . सदरची रक्कम अर्जदार यांनी वेळोवेळी व्याजासहीत ४ ते ५ लाख रुपये परत केलेले आहे. या व्याजाच्या व्यवहाराविषयी त्यांना पुर्ण माहिती आहे. या गट नं.२०९ मध्ये काही क्षेत्र त्यांचे नावे असुन ते जमिन कसत आहेत. वर उल्लेखित गट नं.२०९ मध्ये ०१एकर शेत जमिन त्यांच्या नावाने चुकीने आली असल्याने ती

१ एकर जमिन अर्जदार यांच्या मालकीची आहे. अर्जदार यांच्या सांगण्यानुसार त्यांनी सदर जमिन गैरअर्जदार यांच्या नावाने लिहुन दिली आहे,असे म्हणणे सादर केलेले आहे.

दिनांक १७/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व त्यांचे वकील उपस्थित तसेच गैरअर्जदार १ यांच्या वतीने त्यांचे वकील उपस्थित तसेच गैरअर्जदार १ श्रीमती सुमनबाई यांनी दिलेल्या जवाबावर गैरअर्जदार १ चे म्हणने व कागदपत्र सादर करण्यासाठी मुदत मागितली तसेच अर्जदार यांचे वकीलांनी मुदत वाढ देण्यासाठी आक्षेप घेतला सबब पुढील सुनावणी दिनांक २१/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार श्री. जगन्नाथ बोगाने हजर तसेच गैरअर्जदार १ यांचे मार्फत त्यांचे वकील अॅड प्रमोद कुळकर्णी उपस्थित तसेच अर्जदार यांचे वकील एम.एस.कराड यांना मा. जिल्हाधिकारी येथे सुनावणी असल्या कारणाने पुढील सुनावणी दिनांक २३/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व त्यांचे वकील एम.एस.कराड हजर तसेच गैरअर्जदार व त्यांचे वकील प्रमोद कुळकर्णी हजर तसेच गैरअर्जदार १ यांच्या वकीलाने गैरअर्जदार २ यांनी दाखल केलेल्या जवाबाला प्रतिजवाब दाखल केला आहे. तसेच सि.पि.सी कलम ११ प्रमाणे प्रस्तुत तक्रार अर्जदार दाखल करू शकत नाही. सदरील तक्रार फेटाळुन लावावी असा अर्ज सादर केला तसेच त्याची प्रत अर्जदार व गैरअर्जदार २ याचे वकीलास देण्यात आली.

यावर अर्जदार यांचे वकीलाने म्हणने मांडले की, प्रतिवादी क्र.१ यांनी सदरची तक्रार चालत नसल्यामुळे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे फौजदारी अर्ज क्र.९१७/२०१५ दाखल करून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, यापुर्वीच गैरअर्जदार क्र.१ यांच्या विरोधात सावकारी कायदया अंतर्गत तक्रार खारिज झालेली आहे. त्यामुळे नव्याने दाखल केलेले तक्रार चालविण्यात येणार नाही. मा. उच्च न्यायालयाने गैरअर्जदार १ व अर्जदार यांचे म्हणने ऐकुन मा. न्यायालयाने दिनांक १५/०१/२०१६ रोजी गैरअर्जदार १ यांची याचिका निकाली काढली आहे. त्यामुळे त्याच मुद्यावर दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा व प्रकरण पुढे चालु ठेवावे असे नमुद केले.

यावर गैरअर्जदार याचे वकील यांनी म्हणने मांडले की, मा. उच्च न्यायालयातील गैरअर्जदार १ यांनी केलेला फौजदारी अर्ज क्र. ९१७/२०१५ मध्ये मा. न्यायालयाने असे स्पष्ट केले की, गैरअर्जदार क्रमांक १ यांचा फौजदारी अर्ज ऐकनार नाही. कारण गैरअर्जदार १ यांच्या विरूध्द कुठलीही कार्यवाही केलेली नाही. जर अशी कार्यवाही झाली तर गैरअर्जदार १ यांना योग्यत्या प्राधिकरणाकडे अर्ज करण्याची मुभा आहे. आणि त्या अनुषंगाने गैरअर्जदार १ यांनी सदरील प्रकरणात अर्ज केलेला आहे. तो अर्ज मंजुर करून तक्रारदाराचा अर्ज फेटाळण्यात यावा.

अशी विनंती केली, यावर गैरअर्जदार २ यांच्या वकीलांनी असे म्हणने मांडले की, गैरअर्जदार क्रमांक १ त्यांनी दिलेल्या अर्जातील मुद्यावर आधारीत या अगोदरच दाखल केलेला फौजदारी अर्ज क्र ९१७/२०१५ मा. उच्च न्यायालयाने ऐकुन घेण्यास नकार देत निकाली काढलेला आहे. त्यामुळे कलम ११ नुसार दाखल केलेला सदरचा अर्ज फेटाळुन प्रकरणात पुढील सुनावणी घेण्यात यावी. तसेच फौजदारी अर्ज क्र.३७७६/२०१४ हा देखील गैरअर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेला अर्ज मा. उच्च न्यायालयाने त्यांचेकडील आदेश दिनांक ०८/०१/२०१५ रोजी फेटाळलेला आहे. त्यामुळे या अगोदरच मा. उच्च न्यायालयाने दोन वेळा सदर प्रकरणावर गैरअर्जदार १ यांच्या विरोधात निर्णय दिलेला असल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा असे नमुद केले आहे.

तसेच अर्जदार यांच्या वकीलाने असा युक्तीवाद केला की, या पुर्वीच्या प्रकरणामध्ये गैरअर्जदार या प्रतिवादी नव्हत्या त्यामुळे सदरचा अर्ज त्याच्या विरोधात चालविणे योग्य आहे. तसेच सदरच्या अर्जा संबंधीत प्राधिकरणाने मुद्ये काढलेले आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. यावर गैरअर्जदार १ यांनी असे म्हणने मांडले की, प्रस्तुत तक्रारीमध्ये ISSUE फ्रेम झाल्यानंतर श्रीमती सुमनबाई बोगाने यांना गैरअर्जदार करण्याचे भासल्यामुळे त्यांना सदरील प्रकरणात नोटीस तामिल करून जवाब मागितलेला आहे. म्हनजेच सदरील प्रकरण पुर्व पदावर आलेले आहे.

तसेच सदरील प्रकरणात सि.पी.सी लागु केली असल्यामुळे गैरअर्जदार १ ची विनंती की. सदरील Res Judicata अर्ज मंजुर करण्यात यावा. वरील अर्जदार व गैरअर्जदार यांच्या सुनावणी दरम्यान सदर दावा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम १८ नियम १७ नुसार दिनांक ०३/०२/२०१६ रोजी दाखल होऊन सदर दाव्यामध्ये नियम १७ प्रमाणे पुर्तता केलेली असल्यामुळे सदर दाव्याची कलम १८ व नियम १७ मध्ये नमुद नोंद घेण्यात येऊन प्रस्तुत दाव्यास क्रमांक १०/२०१६ देण्यात आला. गैरअर्जदार यांना नियम १७ प्रमाणे सुनावणीसाठी कळविले त्यानुसार प्रस्तुत दाव्यात आठ सुनावण्या होऊन दिनांक ०५/०३/२०१६ रोजी दाव्यातील मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहे. ते खालील प्रमाणे

मुद्दा क्र.

१. सदर व्यवहार सावकारी पोटी जमिन खरेदीखत गहाण म्हणुन आहे काय?

२. प्रस्तुत प्रकरण या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील आहे काय?

३. प्रस्तुत व्यवहारात किती एकर चे खरेदीखत हे गहाण खत आहे ?

उपरोक्त तिन मुद्दे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार मुद्दा क्रमांक ३ बाबत प्रस्तुत दाव्यातील खरेदीखत हे गहाण खत किती क्षेत्राचे आहे. या करीता मुळ खरेदीखत/ गहाण खत करून देणाऱ्या श्रीमती सुमनबाई रामभाऊ

बोगाने यांना गैरअर्जदार २ करण्यात आले कारण प्रस्तुत दाव्यात अर्जदार यांचा दावा त्याच्या नावावरील जमिन अर्जदाराचे मालकीची आहे. असे अर्जदाराने सांगितल्या वरून त्यापोटी खरेदी/गहाणखत क्षेत्र १ एकर आहे आणि श्रीमती सुमनबाई बोगाने गैरअर्जदार २ यांनी वकीला मार्फत उपस्थित होऊन त्यांचे म्हणने दाखल केलेले आहे. पुढे दोन सुनावण्या झाल्या तदनंतर त्यांच्या म्हणन्यावर गैरअर्जदार १ यांनी त्यांचे प्रती म्हणने आजचे सुनावणीस सादर केले आहे तसेच गैरअर्जदार १ यांनी प्रस्तुत दाव्यात दाव्याची प्रत मिळाल्यानंतर त्यांचे म्हणने दिनांक १७/०२/२०१६ रोजीच्या सुनावणीत दाखल केले आहे. आणि आज दिनांक २३/०३/२०१६ च्या सुनावणी दरम्यान दाव्या मधील सावकारी व्यवहाराचे प्रस्तुत खरेदी/गहाणखत संदर्भाने या पुर्वी अर्जदाराच्या दिनांक ११/०२/२०११ च्या तक्रारीवर तालुका उपनिबंधक,औरंगाबाद यांनी दिनांक०६.०१.२०१२ रोजी निर्णय देवुन सदर तक्रार अलविदा निकाली काढली असल्यामुळे परत सदर तक्रारीवर या प्रस्तुत प्राधिकरणास निर्णय देता येणार नाही (Application as per section ११) (Res judicata) सि.पी.सी. नुसार अर्ज दिला याबाबत तालुका निबंधक यांचे पत्र दिनांक ०६.११.२०१२ पाहिले असता प्रस्तुत अर्जदार यांचे दिनांक ०४.०५.२०१२ तक्रारीवर सुनावणी अंती अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे ऐकुण तक्रार निकाली काढतांना शेवटी नमुद केले आहे की,अर्जदार यांनी सावकारी बाबतचा दाखल केलेला पुरावा म्हणुन दिलेल्या बॉन्डवर नमुद व्यक्तीस (महेंद्र आसाराम पवार रा.गारखेडा परिसर औ.बाद) सुनावणी समई प्राधिकरणासमोर उपस्थित केले नाही त्यामुळे दाखल केलेला पुरावा सत्य आहे व त्यावरील स्वाक्षरी नमुद व्यक्तीचे आहे. हे पडताळन्याचे अधिकार या प्राधिकरणाचे कार्यक्षेत येत नाही तसेच जाबदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अर्जदार यांनी दिनांक ३०.११.२००० रोजी जमिनीची विक्री खरेदीखताव्दारे केली आहे.सदरचा व्यवहार हा Transfar of property Act १८८२ मधील तरतुदीनुसार झालेला आहे. अर्जदार यानी जबाबदार हे सावकारी व्यवसाय करतात याबाबतचे सबळ पुरावे दाखल केलेले नाही. तसेच झालेल्या खरेदी खतामध्ये सावकारीचा व्याजदाराचा कोणत्याही प्रकारे उल्लेख नसल्यामुळे व जाबदार हे जमिन खरेदी विक्री व्यवहार वारंवार करतात याबाबतचे पुरावे दाखल केलेले नसल्यामुळे मुंबई सावकारी अधिनियम १९४६ अंतर्गत हा व्यवहार येत नाही याबाबत अर्जदार त्या सक्षम न्यायालयात दाद मागु शकतात.

वरील पत्र पहाता तालुका उपनिबंधक यांचे ०६.११.२०१२ रोजी अर्जदार यांची तक्रार दिनांक ०४.०५.२०१२ निकाली काढते वेळी खरेदीखत Transfar of property Act १८८२ मध्ये झालेले असल्याने आणि मुंबई सावकारी अधिनियम १९४६ मध्ये खरेदी विक्रीचा व्यवहार सावकारी अंतर्गत येत असलेबाबत नमुद नसल्यामुळे सदर प्रकरण योग्य त्या सक्षम न्यायालयात दाद मागण्याच्या अभिप्रायसह निकाली काढले आहे. सदर प्रकरणामध्ये तत्कालीन मुंबई सावकारी अधिनियम १९४६ मध्ये जमिन खरेदी विक्री व्यवहाराची सावकारी कायदयाअंतर्गत खरेदीखताव्दारे गहाण मालमत्ता जाहिर करणे किंबहुना खरेदीखत हे गहाण खत म्हणुन (सावकारी अंतर्गत जाहिर

करणे बाबत स्पष्ट तरतुद नसल्यामुळे सावकारी अंतर्गत मालमत्ता खरेदी विक्री व्यवहाराची चौकशी करता येत नव्हती म्हणुन महाराष्ट्र शासनाने सावकारी अंतर्गत खरेदी खत हे गहाण खत असल्याचे घोषित करणे त्याचा फेरफार व ताबा रद्द करणे व मालमत्ता मुळ मालक तथा हस्तांतरणकार यांचे सुपुर्त करणे या करिता विशेष कलम म्हणुन कलम १८ व त्याअनुषंगाने कारवाई करण्याकरिता या प्राधिकरणाला अधिकार क्षेत्र दिले आहे म्हणुन प्रस्तुत प्रकरणी २०१४ कायदा येण्यापुर्वी १९४६ च्या कायदया अंतर्गत ज्या मध्ये गहाणखत जाहिर करण्याची तरतुद नव्हती तेव्हा व सदर बाबतचे अधिकार क्षेत्र नसल्याने अधिका-याने सक्षम न्यायालयात दाद मागण्याच्या अभिप्रायासह निकाली काढलेले प्रकरण म्हणजे प्रस्तुत अर्जदाराच्या संबंधाने पुर्वी झालेला निकाल आहे. हे म्हणणे व अर्जदाराच्या नविन अर्जावर नव्या कायदयाच्या (२०१४) नविन विशेष तरतुदी नुसार अधिकार क्षेत्र असणा-या अधिकाराने निर्णयाकरिता चालविणे (प्रस्तुत दावा) न्यायोचित नाही म्हणुन सदर तक्रार फेटाळावी हे दिनांक २३.०३.२०१६ च्या अर्जाव्दारे केलेली मागणी (गैरअर्जदाराची) फेटाळणे योग्य आहे.त्यामुळे गैरअर्जदार यांचा अर्ज दिनांक २३.०३.२०१६ फेटाळण्यात आलेला आहे.अर्जदार गैरअर्जदार यांच्या साक्षीपुरावा करिता पुढील सुनावणी दिनांक ३१.०३.२०१६ रोजी ३.०० वाजात ठेवण्यात आली.

दिनांक ३१.०३.२०१६ रोजी सुनवणीस अर्जदार व त्यांचे वकील हजर तसेच गैरअर्जदार तर्फे त्यांचे वकिल प्रमोद कुलकर्णी हजर,तसेच त्यांनी म्हणणे मांडले की, सदरील प्रकरणात गैरअर्जदार क्र.१ यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दिनांक २३.०३.२०१६रोजीच्या आदेशाच्या विरोधात फौजदारी अर्ज दाखल केलेला आहे व सदर प्रकरणी पुढील सुनावणीची तारीख आठ दिवसाची देण्यात यावी.

यावर अर्जदार यांचे वडील अॅड एम.एस. कराड यांनी म्हणने मांडले की,आज रोजी सदरील प्रकरण अर्जदार व साक्षीदार याचे उलट तपासणी करीता ठेवलेले आहे. तसेच आज रोजी अर्जदार व साक्षीदार स्वत: उपस्थित आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१ यांचे वकिलांनी अर्जदार व साक्षीदार याचा उलट तपास घेतला नाही तर अर्जदार व साक्षीदार यांचा उलट तपास गैरअर्जदार क्र.१ घेत नसल्यामुळे प्रकरणात सुनावणी घेवुन निर्णय पारित करण्यात यावा.यावर गैरअर्जदार क्र.२ यांचा काही एक अक्षेप नाही यानंतर गैरअर्जदार क्र.१ यांचे अभियोक्ते यांनी म्हणने मांडले की, अर्जदार व साक्षीदार याचे उलट तपास घेणे पुर्वी प्रकरणात अर्जदार दुस-यांदा सावकारी कायदयाअंतर्गत अर्ज केल्यामुळे त्याबाबत मा.उच्च न्यायालय औ.बाद येथे फौजदारीअर्ज दाखल केलेला असुन सदरील प्रकणात एक सुनावणी होइपर्यंत प्राधिकरणास थांबण्याबाबत विनंती केली आहे.जर प्राधिकरण सदरील विनंती मान्य करित नसेल तर गैरअर्जदार क्र.१ यांचे अभियोक्ते उलट तपास घेण्यास तयार आहे.यावर अर्जदार याचे अभियोक्ते यांनी म्हणणे मांडले की, म उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या फौजदारी अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचे स्थगती आदेश नाहीत फौजदारी अर्जाचा नंबर सुध्दा दिलेला नाही तसेच अर्जदार व साक्षीदार हजर

असल्यामळे उलट तपास घेण्यात येवुन प्रकरणात निर्णय पारित करावा व प्रकरणात ठरल्याप्रमाणे अर्जदार व साक्षीदार उलट तपास घेण्यात यावा ,व गैरअर्जदार क्र.१ यांचे मुदतवाढ मिळणे बाबत विनंती फेटाळण्यात यावी. अशी विनंती केली.

उलट तपास गैरअर्जदार यांचे वकिल श्री प्रमोद कुलकर्णी मार्फत सुरु करण्यात आला. त्याउलट तपासात अर्जदार यांनी शपतेवर निवेदन केले की ते लायगाव येथील रहिवासी असुन व्यवसायाने शेती करतात अर्जदार हे चार भाऊ असुन त्यापैकी ०२ मयत आहे त्या चार भावाची नावे १.मयत -रामनाथ बाबुराव बोंगाने २.श्री आत्माराम बाबुराव बोंगाने ३.एकनाथ बाबुराव बोंगाने व अर्जदार असे चार भाउ आहेत. श्री रामभाउ सखराम बोंगाने हे अर्जदार यांचे नात्याने सख्ये चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यांचा व रामभाउचा खरेदी विक्रीचा व्यवहार झाला.त्यांना वडिलोपार्जित एकत्रित सर्व भाउ मिळुन ८.२२ आर जमिन होती. त्यांच्या वाटण्या कधी झाल्या हे त्यांना सांगता आले नाही.सन १९९९ पासुन ज्याची त्याची जमीन कसत असुन उदर निर्वाह करीत आहे. श्री रामभाउ ,बोंगाणे अंदाजे वीस वर्षापुर्वी मयत झाले .त्यांची व रामभाउ बोंगाणे याची जमिन लगत आहे. त्यांचे व रामभाउ बोंगाणे यांचे संबंध चांगले आहे. त्यांच्यात व रामभाउ व सुमनबाई यांच्यात अर्थिक व्यवहार होत नव्हते.त्यांच्या वाटयाला २ एकर १० गुंठे जमिन आली आहे. त्यांनी २ एकर १० गुंठे जमिनीचा मालकी हक्का बाबतचा पुरावा प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. व पुराव्याच्या शपथपत्रात देखील त्यांनी २ एकर १० गुंठेचे मालक असलेबाबत नमुद केले नाही. तसेच पुढील वृत्तांत सुनावणी दरम्यान घडलेल्या घटनेमुळे केलेल्या पंचनाम्याप्रमाणे आहे. त्या पंचनाम्याची माहिती खालील प्रमाणे

**पंचनामा :-** सुनावणी दरम्यान दिनांक ३१.०३.२०१६ रोजी या कार्यालयात अर्जदार विरुध्द गैरअर्जदार यांचे सावकारी प्रकरणात या कार्यालयाचे दालनात सुनावणी सुरु होती. सुनावणी दरम्यान सायंकाळी १७.३० वाजता असे निदर्शनास आले की, गैरअर्जदार यांचा मुलगा श्री विनोद रविंद्र हिरे हे त्यांच्या ॲपल कंपनीच्या मोबाईल मध्ये गोपनिय रित्या रेकॉर्डींग करित असल्याचे निदर्शनास आले आहे. हया वेळी गैरअर्जदार यांचे वकील अर्जदार यांचा उलट तपास घेत होते. त्यामधील एका प्रश्नावर अर्जदार भावनाविवश होवुन याच वकिल साहेबांनी (ॲड कुलकर्णी) यापुर्वीही त्यांना न्यायालयाच्या सुनावणी प्रकरणाच्या वेळी आणि तालुका उपनिबंधक,यांच्याकडील सुनावणीच्या वेळी ते बसलेल्या गाडीमध्ये त्यांना अडविलेले आहे. धाक धपटशा केला आहे. याबाबत क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे त्यांनी अर्ज दिलेला आहे. असे जोराने बोलत होते.त्यावेळी गैरअर्जदार यांचा मुलगा श्री विनोद रविंद्र हिरे वय २७ वर्ष, शिक्षण एम कॉम, हे मोबाईल मध्ये सुनवाणी सुरु असल्याची व्हीडीओ रेकॉर्डींग करित होते. यावरुन हे लक्षात येते की, सदर तक्रार २०१४ पासुन सुरु असुन यापुर्वीही सन २०११ मध्ये तक्रार झाली होती तेव्हांही ॲड श्री कुलकर्णी हेच गैरअर्जदार यांचे वकील होते यावरुन अशी शंका येते की, अर्जदार भावना विवश होवुन/चिडुन

खवळावे असे प्रश्न व चिडल्यानंतर त्यांची व्हिडीओ रेकॉर्डींग करावी असे विचारपुर्वक नियोजन होते .त्यामुळे सदर प्रकरण यामधील अर्ज , झालेली झडती,यापुर्वीची चौकशी ,याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल दावे अनेक अर्जदार यांच्या गैरअर्जदार यांच्या संदर्भात आलेला तक्रारी,त्यांचे शपथपत्रातील जवाब प्राधिकृत अधिकारी यांचा अहवाल ,इत्यादी आढळुन आलेल्या बाबी यासर्व बाबी /पुरावे हे गैरअर्जादाराच्या विरुध्द जात असल्याचे गैरअर्जदाराच्या लक्षात आल्यामुळे या प्राधिकरणाला प्रस्तुत दाव्यात निर्णय घेता येवु नये म्हणुन ही सर्व उठाठेव गैरअर्जदार क्र.१ यांनी केलेली आहे. म्हणुन प्रस्तुत प्रकरण तसेच प्रस्तुत गैरअर्जदार यांच्या विरुध्द या प्राधिकरणासमोर दावा क्र.११/२०१६ श्री अंबादास यशवंत बोंगाणे विरुध्द श्रीमती कमलबाई हिरे, दावा क्र.१२/२०१६ श्री एकनाथ बापुराव बोंगाणे ,दावा क्र.१३/२०१६ श्री शिवाजी यशवंत बोंगाणे (मयत) यांचे वारस श्री बाबासाहेब शिवाजी बोंगाणे इत्यादी दाव्यामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचे लेखी म्हणने प्राप्त झालेले आहे.सावकारी संबधाच्या मुळ तक्रारीवर चौकशीही झालेली आहे.त्यामुळे प्रस्तुत दावा क्र.१०/२०१६,११/२०१६,१२/२०१६ व १३/२०१६ उपलब्ध कागदपत्राच्या आधारे निर्णय घेण्याकरिता सदर सर्व चार प्रकरणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सदर नमुद मोबाईलमधील रेकॉर्डीग गैरअर्जदार यांचा मुलगा श्री रविंद्र हिरे यांच्याकडुन सदर मोबाईलचा कोड (पासवर्ड) घेवुन उघडण्यात आला व रेकॅर्डीग पाहिली असता रेकॅर्डीगचा फोकस अर्जदार यांच्या वर असुन ते चिडल्यावरचे रेकॉर्डीग केले आहे. सदर रेकॅर्डीग अर्जदार व गैरअर्जदार यांचे वकील यांनाही दाखविण्यात आले. यावर गैरअर्जदार यांचे वकील ॲड श्री कुलकर्णी यांनी नमुद केले की, अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र.०१ याचे वकील म्हणजेच त्यांच्यावर केलेले आरोप खोटे आहेत.गैरअर्जदार यांनी देखील अर्जदाराच्या वकीलावर त्यांच्याकडे आक्षेपार्ह वागणुकीबाबत खाजगीत बोललेले आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांचे वैयक्तीक न्यायालयीन प्रकरण आहे त्यामुळे अर्जदार गैरअर्जदार यांच्या वकीलांचा वैयक्तीक बाबीशी काहीही संबंध नाही. गैरअर्जदार क्र ०१ यांचा मुलगा श्री विनोद हिरे यांनी भ्रमण यंत्राव्दारे चलचित्रफित (व्हिडिओ)हि केवळ अर्जदाराच्या बाबत होती .त्यामुळे सदरील चुक ही गैरअर्जदार क्र.०१ यांच्या मुलाच्या लक्षात आली असुन ती मान्य करुन मा.न्यायालयाची माफी मागीतली त्यांचा मोबाईल परत करण्याची विनंती केली . यावर अर्जदाराचे वकील ॲड एम.एस.कराड यांनी नमुद केले की, प्रस्तुत प्राधिकरणासमोर वकीलपत्र दाखल करुन हजर झालेलो आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांचे वकीलाचे म्हणणे तथ्यहिन आहे. यावर अर्जदार /गैरअर्जदार व प्रस्तुत गैरअर्जदाराच्या विरुध्दचे दावे क्र.१०/२०१६,११/२०१६,१२/२०१६,व १३/२०१६ उपलब्ध लेखी पत्राव्दारे सर्व निर्णय घेवुन निकाली काढण्याचे प्राधिकरणाने निश्चित केले तसेच गैरअर्जदार यांचा मुलगा श्री विनोद हिरे यांचा मोबाईल मधील चित्रफित इतर मोबाईलमध्ये कॉपी करुन त्यांच्या मोबाईलमधील चित्रफित डिलीट करुन त्यांचा मोबाईल परत करण्यात आला. व सदर प्रकरणाची पार्श्वभुमी मागील ०८-१० वर्षापासुन प्रस्तुत वाद आणि त्यामुळे अर्जदाराचा सुटलेला संयम आणि

गैरअर्जदाराच्या मुलाचे वय शिक्षण व भवितव्याचा विचार करुन सदर प्रकरणी त्यांना समज देवुन दावे निर्णयास्तव बंद करण्यात आले.

उपरोक्त प्रमाणे अर्जदार यांचा अर्ज त्यावर त्यांचे वकीलाचे म्हणणे ,गैरअर्जदार व त्यांचे वकिल यांचे म्हणणे, चौकशी अधिकारी यांचा अहवाल,सुनावणी दरम्यान प्राप्त पुरावे व सहपत्र ,दिनांक०५.०३.२०१६ रोजीच्या सुनावणीमध्ये निश्चित केलेले मुद्दे याबाबत सखोल सुनावणीअंतीचे निम्नस्वाक्षरीत यांचे मत खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र | सुनावणीमध्ये निश्चित केलेल मद्दे | त्यावर निम्नस्वाक्षरीत यांचे मत |
|---|---|---|
| १ | सदर व्यवहार सावकारी पोटी जमिन खरेदीखत गहाण म्हणुन आहे काय? | होकारार्थी |
| २ | प्रस्तुत प्रकरण या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील आहे काय? | होकारार्थी |
| ३ | प्रस्तुत व्यवहारात किती एकर चे खरेदीखत हे गहाण खत आहे ? | होकारार्थी |

याबाबतचे निश्चित झालेल्या मुद्याचे उत्तर होकारार्थी दिलेले असल्याने त्याबाबतचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

सुनावणी अंती , प्राप्त पुरावे, अर्जदार गैरअर्जदार यांचे म्हणणे विचारात घेता मुद्या क्र.०१ नुसार सदर व्यवहार हा सावकारी पोटी जमिन खरेदी खत गहाण आहे काय ? याबाबत यामुद्याचे उत्तर होकारर्थी दिलेले आहे.कारण याबाबत व्यवहारातील मध्यस्थी साक्षिदार यानी सदरचा व्यवहार हा अवैध सावकारीत झाल्याबाबत उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचे समक्ष पुरावाव्याचे शपथपत्र सादर केलेल्या आहे तसेच या कार्यालयात झालेल्या सुनावणीच्या वेळीही काही साक्षिदारांनी पुराव्याचे शपथपत्र सादर केलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे

अर्जदार यांनी त्यांचे अर्जासोबत १. श्री उत्तमराव अश्रुबा बोंगाणे रा.लायगाव ता.जि. औ.बाद

२. श्री निजाम अब्बास पठाण रा.लायगाव ता.जि.औरंगाबाद

३. श्री हसन उस्मान पठाण रा.लायगाव ता.जि.औ.बाद

४. श्री हरिभाउ सुर्यभान नागरे रा.लायगाव ता.जि. औ.बाद

यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औ.बाद यांचे समोर दिनांक ३१.१२.२०१४ रोजी दिलेल्या शपथपत्राची प्रत जोडलेली आहे. त्या शपथपत्रामध्ये सदरहु शपथपत्र करून देणारे साक्षिदार यांनी असे नमुद आहे की, गैरअर्जदार सावकार यांच्या बेकायदेशीर सावकारी बदल्यात अर्जदार यांनी गट नं.२०९ मधील ०२ एकर जमिन सन २००० मध्ये सावकारास रक्कम रु. मुद्यल ६९०००/- ५% शेकडयाच्या व्याजाबदल्यात खरेदी खताव्दारे सदर कर्जास गहाण करुन

दिल्याचे आणि ही जमिन आजही अर्जदार यांचेच ताब्यात असल्याबाबतचे शपथेवर नमुद केलेले आहे.तसेच त्याबाबतचे त्याच्या नावाने महसुली रेकॉर्ड ७ब ची नोंद आहे. आजही अर्जदार यांनी या जमिनीमध्ये ०१ एकर कापुस व ०१ एकर हरभरा पेरलेला आहे. सदर जमिन सावकारी कर्जाच्या बदल्यात खरेदी खताव्दारे रजिस्ट्री करुन दिलेली असुन गैरअर्जदार यांचे सर्व पैसे ५% व्याजाने आतापर्यंत रु.१,८०,०००/- परत केले .सदर गहाण जमिन परत करण्याविषयी व त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी यासाठी सदरचा जवाब दिनांक ३१.१२.२०१४ रोजी लिहुन दिलेला आहे.

तसेच अर्जदार यांनी या साक्षिदारापैकी दिनांक ०१.०३.२०१६ रोजी पुराव्याचे शपथपत्र सुनावणी दरम्यान सादर केलेले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे

सदरहु सुनावणीच्या वेळी अर्जदार यांच्या वतीने श्री. हरीभाऊ सुर्यभान नागरे यांनी पुराव्याचे शपथपत्र सादर केले असून त्या शपथपत्रात श्री. हरीभाऊ सुर्यभान नागरे यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २ एकर शेतजमिन गैरअर्जदार यांना सावकारी पोटी पैशास धर म्हणुन दिलेली आहे. अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी सावकारी कर्जापोटी रू. ६९०००/- दिलेले होते. अर्जदार यांनी त्यांच्या समक्ष गैरअर्जदार यांना संपूर्ण व्याजासहीत रक्कम डिसेंबर २०१० मध्ये परत केलेली आहे. परंतु गैरअर्जदार सावकार यांनी संपुर्ण व्याजासहीत पैसे परत केलेले असतांना सुध्दा अर्जदार यांच्या हक्कात जमिनीचे खरेदीखत करून दिलेले नाही. तसेच विवादीत जमिनीवर अर्जदार यांचा ताबा आहे. असे शपथपत्र नोटरी समक्ष लिहुन देऊन सुनावणीच्या वेळी सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अर्जदार यांच्या वतीने दुसरे साक्षीदार श्री. हसन उस्मान पठाण यांनी पुराव्याचे शपथपत्र सादर केले असून त्या शपथपत्रात श्री. हसन उस्मान पठाण यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २ एकर शेतजमिन गैरअर्जदार यांना सावकारी पोटी पैशास धर म्हणुन दिलेली आहे. अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी सावकारी कर्जापोटी रू. ६९०००/- दिलेले होते. अर्जदार यांनी त्यांच्या समक्ष गैरअर्जदार यांना संपुर्ण व्याजासहीत रक्कम डिसेंबर २०१० मध्ये परत केलेली आहे. परंतु गैरअर्जदार सावकार यांनी संपुर्ण व्याजासहीत पैसे परत केलेले असतांना सुध्दा अर्जदार यांच्या हक्कात जमिनीचे खरेदीखत करून दिलेले नाही. तसेच विवादीत जमिनीवर अर्जदार यांचा ताबा आहे. असे शपथपत्र नोटरी समक्ष लिहुन देऊन सुनावणीच्या वेळी सादर केलेले आहे.

तसेच चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात घर झडती दरम्यान जप्त केलेल्या खरेदी खतानुसार या प्रकरणात अवैध सावकारी असल्याबावत त्यांचे स्पष्ट मत नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी या विवादीत शेत जमिनीच्या ताब्याबाबत जाय मोक्यावर जावुन २९.०६.२०१४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. त्यानुसार विवादित शेत जमिनीवर अर्जदार यांचाच ताबा असुन या जमिनीवर ते पीक घेत असुन जमिनीची मशागत करीत आहे. या पंचनाम्यावर तपासणी पथकातील सदस्य व साक्षिदारासह २६ व्यक्तीच्या स्वाक्ष-या आहेत .

अर्जदार यांनी त्यांचे अर्जासोबत श्री डी.एन.भारस्कर नायब तहसिलदार महसुल १ यांनी दिनांक १०.०६.२०११ रोजी मा.तहसिलदार औ.बाद यांना लिहलेल्या अहवालाची प्रत सादर केलेली असुन त्यामध्ये नायब तहसिलदार यांनी असे नमुद केले आहे की, मौजे लायगाव ता.जि.औ.बाद येथील गट नं.२०९ मधील जमीनीच्या स्थळ पाहणीबाबत माहिती नमुद असुन त्यांनी दिनांक ०५.०५.२०११ रोजी समक्ष जाय मोक्यावर जावुन स्थळ पाहणी करुन त्याबाबत पंचनामा केलेला आहे. त्या पंचनाम्यानुसार त्यांनी अहवालात असे नमुद केले आहे की, मौजे लायगाव ता.जि.औ.बाद येथील गट नं.२०९ मध्ये अर्जादार यांची वडीलोपार्जित जमिन असुन यापैकी ०१हेक्टर २५ आर जमिन गैरअर्जदार यांचे मालकीची कागदोपत्री आहे. सदरील जमिनीवर अर्जदाराचा प्रत्यक्ष कब्जा असल्याने अर्जदाराचे नाव वहितीस लावणेबाबत अर्जदाराने दिनांक ०१.०७.२०१० रोजी अर्ज सादर केलेला आहे. गैरअर्जदार यांनी दिनांक २१.०१.२०११ रोजी अर्ज देवुन कळविले आहे की, त्यांची लायगाव येथे गट नं.२०९ मध्ये ४ एकर जमिन सन २००० मध्ये घेतलेली असुन पीक पेरे व इतर महसुली दस्तऐवजावर त्यांचे नाव लागलेले आहे. अर्जदार हे त्यांच्या कडे सालगडी म्हणुन पाहत आहे. व ते जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांनी अर्जदार यांचे विरुध्द मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. नायब तहसिलदार यांनी प्रत्यक्ष जाय मोक्यावर जावुन स्थळ पाहणी केली असता मौजे लायगाव येथील गट नं.२०९ मधील जमिनीचे क्षेत्र ०१ हेक्टर ४५ आर ज्यांच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे आहेत.

पुर्वेला - सुमनबाई रामभाउ

पश्चिमेला - रावसाहेब पाटील तोताराम पाटील

दक्षिणेला - दत्तु धर्माजी खुरमुटे,शिवाजी धर्माजी खुरमुटे

उत्तरेला - रावसाहेब व संजु काळु बोंगाणे

सदरील गट न.२०९ मधील १ हेक्टर २५ आर जमिन अर्जदार यांची वडीलोपार्जित जमिन असुन सन १९९९ मध्ये अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना खरेदीखत करुन दिल्याचे पंचासमक्ष उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले तथापि सदरील १ हेक्टर ४५ आर जमिन अर्जदार यांच्या ताब्यात असुन सदर जमिनीचे वहितीचे व मशागतीचे काम अर्जदार हेच करित असल्याबाबत उपस्थित शेतकरी यांनी पंचासमक्ष सांगितले . त्यानुसार लायगाव येथील गट नं.२०९ मधील १ हेक्टर ४५ आर जमिनीची प्रत्यक्ष वहिती अर्जदार हे करीत असल्याचे व त्यावर अर्जदार यांचाच ताबा असल्याचे त्यांनी त्यांचे अहवालात नमुद केलेले आहे.

यावरुन असे दिसुन येते की, खरेदी विक्री चा व्यवहार असता तर शेत जमिन अर्जदाराच्या ताब्यात न राहता ती गैरअर्जदाराच्या ताब्यात राहिली असती.याठिकाणी पुर्वीपासुन ते आजपर्यंत शेत जमिनीचा ताबा हा अर्जदार यांचे कडे असल्याने व या व्यवहारातील मध्यस्थी साक्षिदार हे अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्यातील व्यवहार हा अवैध

सावकारी व्यवहार असल्याबाबत पुष्ठी देत आहे तसेच गैरअर्जदार यांच्या विरुध्द अवैध सावकारीबाबत या कार्यालयास आणखी दावा क्र.११/२०१६,१२/२०१६,१३/२०१६ चालु आहे त्यामुळे गैरअर्जदार हे अवैध सावकारी करता हे सकृत दर्शनी सिध्द होत असल्याने मुद्या क्र. ०१ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

मुद्या क्र.०२ चे उत्तर होकारर्थी दिलेले आहे.गैरअर्जदार यांनी नमुद केलेले आहे की, याप्रकरणी तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांनी दिनांक ०६.११.२०१२ रोजी निर्णय दिलेला असुन त्यांमध्ये अर्जदाराच्या अर्जावर यापुर्वी चौकशी झालेली असल्याने प्रकरण बंद करण्यास विनंती केलेली आहे. याबाबत निम्न स्वाक्षरीत सहमत नाही.कारण.

या प्रकरणी अर्जदार व इतर आणि गैरअर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे फौजदारी याचिका क्र.६००/२०१५,९१७/२०१५ व याचिका २२२/२०१५ दाखल केलेली होती. या दोन्ही याचिकेची एकत्रित सुनावणी होऊन त्यामध्ये दिनांक १५.०१.२०१६ रोजी निर्णय देण्यात आलेला आहे. ह्या याचिकेत अर्जदार यांनी नमुद केले होते की, त्यांचे तक्रारी नुसार संबंधीत प्राधिकारी यांनी कार्यवाही सुरु केली आहे. तथापि या प्रकरणी पूर्ण प्रक्रिया अवलंबली नाही. त्या नुसार मा.उच्च न्यायालयाने दि.१५.०१.२०१६ रोजीचे आदेशात नमुद केले आहेत की, संबंधीत प्राधिकारी यांनी या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलमा नुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. आवश्यकता असल्यास या प्रकरणी अवैध सावकारी अंतर्गत तक्रार ही नोंदवावी. गैरअर्जदार यांनी त्यांचे विरुध्द सुरु असलेली कार्यवाही थांबविणे बाबत मा.उच्च न्यायालयात फौजदारी याचिका क्र.२२२/२०१५ दाखल केलेली होती. त्यामध्ये मा.न्यायालयाने अर्जदार यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने याचिकेत हस्तक्षेप केलेला नाही. व आदेशीत केले की, या प्रकरणी गैरअर्जदार यांचे विरुध्द कार्यवाही झाल्यास योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागावी असे आदेश देऊन अर्जदार व गैरअर्जदार यांची याचिका निकाली काढली आहे.

गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांनी विनंती केली आहे की, सदर प्रकरण अधिकार कक्षे बाहेरील असल्यामुळे फेटाळण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य सहकारी पतपुरवठयात देशात आघाडीवर असून या संरचनेव्दारे शेतक-यांची आर्थिक गरज भागविण्यात येते.तरी देखील काही अपरिहार्य कारणास्तव काही शेतकरी /शेतमजूरांना सावकाराकडुन कर्ज घेण्याची गरज भासते,अशा परिस्थतीत सावकाराकडुन शेतक-यांची पिवळणूक होऊ नये म्हणुन राज्यात सावकारी व्यवसायाचे मुंबई सावकारी अधिनियम १९४६ नुसार नियमन करण्यात येत होते.मात्र या कायद्यातील तरतुदी पुरेशा व प्रभावी ठरत नसल्यामुळे सावकाराकडुन शेतक-यांची होणारी पिवळणुक नियंत्रित करणे अडचणीचे होत होते.सावकाराने अवैधरित्या कर्जदार शेतक-यांची मालमत्ता हडप करणे,कर्जावर अवास्तव दराने व्याज आकारले जाणे यावर पुरेसे निर्बध आणता येत नव्हते.सावकारीतील गैरप्रकार उघडकिस आल्यास या अपराधापोटी

लावली जाणारी शिक्षा अथवा दंड याबाबतची तरतुद सावकारांवर जरब बसण्यइतपत पुरेशी नव्हती, **आणि सावकारी खाली गहाण असलेली जमिन परत करण्याची सदर कायद्यात तरतुद नव्हती** म्हणजेच जूना मुंबई सावकारी कायदा हा अपूरा पडू लागला.परिणामी, सावकारीवरील विद्यमान अधिनियम हा,कर्जदार शेतक-यांचे सरंक्षण करण्यास आणि सावकाराकडुन होणा-या पिळवणुकीस प्रतिबंध करण्यास अपर्याप्त असल्याचे दिसुन आले होते,अशा परिस्थितीत,सावकारांकडुन होणा-या कर्जदार शेतक-यांच्या पिळवणुकीस प्रभावी रीतीने प्रतिबंध करण्यासाठी समुचीत व कठोर समाजीक आणि कायदेशिर उपाययोजना करणे शासनास अत्यावश्यक झाले होते.त्यामूळे कडक निर्बध असलेल्या आणि शेतक-यांची सावकाराकडील जमिन परत करणेस सक्षम सुधारीत असा कायदा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा नविन सुधारीत कायदा दिनांक १६.१.२०१४ पासुन राज्यात लागु करण्यात आला.

सदर कायद्याचा प्रचार प्रसाराकरीता शासनाच्या दिनांक २० जानेवारी २०१४ सुचना नुसार २६ जानेवारी २०१४ या राष्ट्रीय दिनांचे औचित्य साधुन ग्रामपंचायतीच्या स्तरावर होणा-या ग्रामसभेमध्ये सहकार विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या पुस्तीकेचे ग्रामसेवक,तलाठी,सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत वाचन करण्यात येऊन सदर नविन कायद्याची मोठया प्रमाणात प्रसिध्दी देऊन व्यापक जनजागृती,करण्यात आली.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) मधील तरतुदी नुसार कलम १६ खालील पडताळणीच्या दरम्यान किंवा कलम १७ खालील तपासणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे किंवा कर्जदाराचे अर्जा वरून अन्य रितीने जर ह्या पडताळणीच्या किंवा तपासणीच्या दिनांका पासून अथवा कर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांका पासून १५ वर्षाच्या आत विक्री, गहाण, भाडेपट्टा विनियमन या रुपाने किंवा अन्य रुपाने सावकाराच्या कब्जात येणे अभिप्रेत असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ही सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जा बद्दल सावकाराला प्रतिभूती म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या स्वरुपाचे आहे. असे जिल्हा निबंधकास सहकारण वाटत असेल तर त्या जिल्हा निबंधकास स्वतः किंवा त्या प्रयोजनासाठी विहित रितीने नियुक्त करण्यांत येईल. अशा चौकशी अधिकाऱ्या मार्फत या व्यवहाराच्या स्वरुपाची आणखी चौकशी करण्यात येईल अशी तरतुद उक्त अधिनियमात करण्यांत आलेली आहे. आणि

उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार अर्जदार यांचे प्रकरणात सुनावणी / चौकशी सुरु करण्यांत आलेली आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी सुनावणीचे वेळी असे प्रतिपादन केले आहे की, सदर प्रकरण अधिकार कक्षे बाहेरील असल्यामुळे ते फेटाळण्यात यावे. या म्हणण्यास पृष्ठी देता येत नाही. म्हणून कारण गैरअर्जदारांचे विरुध्द यापुर्वी अर्जदार यांचे दिनांक २८/०१/२०१४ रोजीचे सावकारीचे तक्रारी संबंधाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था औरंगाबाद यांना चौकशी करुन अहवाल सादर करणे बाबत कळविले नुसार त्यांचे कार्यालयाचे सहकार अधिकारी

श्रेणी-१ यांनी दिनांक ११/४/२०१४ रोजी गैरअर्जदारांचे घरझडती व प्रत्यक्ष शेतजमिनीचे भेटी पंचनाम्यानंतर दिनांक २०/११/२०१४ रोजीचे सादर चौकशी अहवालात गैरअर्जदारांची सावकारी संशय संबंधाने स्पष्ट नमुद आहे.म्हणून सदर प्रस्तुत प्रकरण या कार्यकक्षेतील असल्याने मुद्या क्र.०२ चे उत्तर होय दिलेले आहे.

मुद्या क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी असल्याने मुद्या क्र.०३ चे उत्तर होकारार्थी येत असुन अर्जदार यांची मौजे लायगाव येथील गट नं.२०९ मधील अर्जदार यांनी खरेदीखताव्दारे करुन दिलेले ४० आर शेतजमिनीचे खरेदीखत व अर्जदार यांच्या वाटयाची गैरअर्जदार क्र.२ श्रीमती सुमनबाई रामभाऊ बोंगाणे यांच्या नावाने असलेली ४० आर जमिन जी गैरअर्जदार यांच्या नावाने सावकारीच्या ओघात खरेदीखताव्दारे गहाण खत म्हणुन कर्जाउ रक्कमेस प्रतिभुती म्हणुन नमुद अर्जदार व गैरअर्जदार २ यांची वरील ८० आर जमिन गहाण खत म्हणुन लिहुन दिलेली आहे.

त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेले म्हणने सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेले साक्षीपुरावे यांचे अवलोकनाअंती अर्जदार श्री.जगन्नाथ पिता बाबुराव बोंगाणे रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांनी त्यांची वडीलोपार्जित मौजे लायगाव ता.जि.औ.बाद येथील गट नंबर २०९ मधील अर्जदार श्री. जगन्नाथ पिता बाबुराव बोंगाने यांचे नावाची ४० आर शेतजमिन व अर्जदार यांचेच वाटयाची गैरअर्जदार २ श्रीमती सुमनबाई रामभाऊ बोंगाने यांचे नावाने असलेली ४० आर शेतजमिन श्रीमती सुमनाबाई रामभाऊ बोंगाने यांनी अर्जदार यांच्या सांगण्यानुसार गैरअर्जदार यांच्या नावाने लिहुन दिलेली आहे.अशी दोन्ही मिळुन एकूण ८० आर शेतजमिन ही रू.६९०००/- मध्ये ५टक्के व्याजदराने मुद्दल व व्याजाच्या परत फेडीनंतर परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखता द्वारे गैरअर्जदार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे रा.इंदिरानगर गारखेडा परिसर औ.बाद यांचे नावाने सावकारी व्यवहारात खरेदीखत क्रमांक ५५४५/२००० दिनांक ३०/११/२००० नुसार अर्जदार व गैरअर्जदार २ यांनी प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली असल्याचे सिध्द झालेले असल्याने सदरचे खरेदीखत रद्द करून ही शेतजमिन मुळहस्तांतरणकार अर्जदार श्री.जगन्नाथ पिता बाबुराव बोंगाणे रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांचीच असल्याने त्यांना परत करणे आवश्यक असल्या बाबतची माझी खात्री झालेली असल्याने त्या बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी.एन.व्ही.आघाव, सावकाराचे जिल्हा निबंधक, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अर्जदार श्री.जगन्नाथ पिता बाबुराव बोंगाणे रा.लायगाव ता.जि.औरंगाबाद यांनी त्यांचे व गैरअर्जदार क्र.२ श्रीमती सुमनबाई रामभाऊ बोंगाने यांच्या नावावर असलेली मौजे लायगाव शिवारातील गट नंबर २०९ मधील ८०

[illegible] खत क्रमांक ५५४५ दिनांक ३०/११/२००० अन्वये सावकार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे [illegible]ड़ा परिसर औ.बाद यांचे नावाने सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन खरेदीखता द्वारे लिहुन [illegible] [illegible]ल्याने सदर शेतजमिनीचे खरेदीखत क्रमांक ५५४५ दिनांक ३०/११/२००० हे सावकारी अंतर्गत [illegible] असल्याने ते अवैध असल्याचे घोषीत करुन रद्द करीत आहे. आणि सदर खरेदीखता मधील [illegible]जमिन अर्जदार हस्तांतरण कार मुळ मालक श्री.जगन्नाथ पिता बाबुराव बोंगाणे रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांना परत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ (६) नुसार संबंधीत सक्षम अधिकारी यांनी या आदेशाच्या अंमलबजावणी अंतर्गत सदर जमिनीचा तसा फेरफार करावा.

सदर आदेश आज दिनांक १८/०४/२०१६ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही.आघाव)
सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

प्रत :-

१. मा.उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद/खुलताबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२. मा.तहसिलदार,औरंगाबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
३. तलाठी ,लायगाव सजा पांढरीपिंपळगाव ता.औ.बाद यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. उपनिबंधक,सहकारी संस्था ता. औरंगाबाद यांना माहितीस्तव रवाना

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद